# लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठ, नागपूर

## ◆★ कंत्राटी तत्वावर पदे भरण्याबाबतची जाहिरात ★◆

जाहिरात क्रमांक : लअतंवि/आस्था/२०२५/७६ दिनांक : १० डिसेंबर , २०२५

लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठात कंत्राटी पद्धतीवर, तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्वावर खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या |
|---|---|---|
| १. | सुरक्षा अधिकारी व अधिक्षक वसतिगृह [ Security Officer & Hostel Warden] | ०१ |
| २. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) [Junior Engineer (Civil)] | ०१ |
| ३. | कनिष्ठ अभियंता (विद्युत) [Junior Engineer (Electrical)] | ०१ |
| ४. | लिपीक - नि - टंकलेखक Clerk cum Typist (MTS) | १३ |
| ५. | प्रयोगशाळा परिचर Laboratory Attendant (MTS) | १० |
| ६. | ग्रंथालय परिचर Library Attendant (MTS) | ०५ |
| ७. | चपराशी Peon | १० |

कंत्राटी तत्वावर भरावयाच्या वरील पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय व पात्रतेच्या इतर निकषासंबंधीची विस्तृत माहिती खालीलप्रमाणे

| १. सुरक्षा अधिकारी व अधिक्षक वसतीगृह [Security Officer & Hostel Warden] | | |
|---|---|---|
| पदसंख्या | : | ०१ (एक) |
| कंत्राट कालावधी | : | ११ महिने |
| एकत्रित मानधन | : | रु. ३५,०००/- |
| शैक्षणिक अर्हता व अनुभव | : | १. सैनिकीसेवेतून किंवा सुभेदार किंवा त्यापेक्षा वरिष्ठ पदावरून सेवानिवृत्त झालेली व्यक्ती किंवा राज्य केंद्र शासनाच्या सुरक्षा विषयक विभागातील सेवानिवृत्त अधिकारी<br>२. संगणकाचे ज्ञान असणाऱ्यास प्राधान्य राहील. |
| वयोमर्यादा | : | सर्व उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ५५ वर्ष राहील. |

| २. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) [Junior Engineer (Civil)] | | |
|---|---|---|
| पदसंख्या | : | ०१ (एक) |
| कंत्राट कालावधी | : | ११ महिने |
| एकत्रित मानधन | : | रु. १८,०००/- |
| शैक्षणिक अर्हता व अनुभव | : | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी किंवा समकक्ष पदवी द्वितीय श्रेणीत/ पदविका परीक्षा किमान प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.<br>२. एम.एस.सी.आय.टी किंवा महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्रा.वि) यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ मध्ये नमुद संगणकीय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विज्ञान तसेच तंत्रनिकेतनाच्या पदवीका धारकास ही अट शीथील राहील.<br>३. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संस्थेमधील प्रत्यक्ष इमारत बांधकामाच्या पर्यवेक्षणाचा, स्थापत्य अभियंत्रिकी संबंधी कामाचा आणि व्यवस्थापन, दैनंदिन पत्रव्यवहार, निविदा व कराररनामे अंदाजपत्रके तयार करणे इत्यादी कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव. |
| वयोमर्यादा | : | सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. |

| ३. कनिष्ठ अभियंता (विद्युत) [Junior Engineer (Electrical)] | | |
|---|---|---|
| पदसंख्या | : | ०१ (एक) |
| कंत्राट कालावधी | : | ११ महिने |
| एकत्रित मानधन | : | रु. १८,०००/- |
| शैक्षणिक अर्हता व अनुभव | : | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रिकी किंवा समकक्ष पदवी द्वितीय श्रेणीत/ पदविका परीक्षा किमान प्रथम श्रेणीत उत्तीर्ण.<br>२. एम.एस.सी.आय.टी किंवा महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्रा.वि) यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ मध्ये नमुद संगणकीय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विज्ञान तसेच तंत्रनिकेतनाच्या पदवीका धारकास ही अट शीथील राहील.<br>३. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संस्थेमधील उच्च दाब विद्युत वाहिनी, जनरेटर, दूरध्वनी यंत्रणा, वातानुकंलित यंत्रे, निवासी व अनिवासी इमारती यांचे विद्युत परिरक्षण, नवीन |

| | | |
|---|---|---|
| | | इमारतीचे स्वतंत्रपणे विद्युत भार संकल्पन, इत्यादी कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव.<br>४. शासनमान्य संस्थेचे विद्युत पर्यवेक्षक (Electrical Supervisor) चा परवाना धारण करीत असल्याबाबतचा दाखला / पुरावा. |
| वयोमर्यादा | : | सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. |

| ४. लिपीक -नी - टंकलेखक [Clerk -cum- Typist] (MTS) | | |
|---|---|---|
| पदसंख्या | : | १३ (तेरा) |
| कंत्राट कालावधी | : | ११ महिने |
| एकत्रित मानधन | : | रु. १६,०००/- |
| शैक्षणिक अर्हता व अनुभव | : | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. किंवा इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र.<br>३. एम.एस.सी.आय.टी किंवा महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्रा.वि) यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ मध्ये नमुद संगणकीय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विज्ञान तसेच तंत्रनिकेतनाच्या पदवीका धारकास ही अट शीथील राहील. |
| वयोमर्यादा | : | सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. |

| ५. प्रयोगशाळा परिचर [Laboratory Attendant] (MTS) | | |
|---|---|---|
| पदसंख्या | : | १० (दहा) |
| कंत्राट कालावधी | : | ११ महिने |
| एकत्रित मानधन | : | रु. १४,०००/- |
| शैक्षणिक अर्हता व अनुभव | : | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान विषयात पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा अभियांत्रिकी संकाय (रासायनिक अभियांत्रिकी / रासायनिक तंत्रज्ञान या विषयात) पदवीका प्रमाणपत्र उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. एम.एस.सी.आय.टी किंवा महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्रा.वि) यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ मध्ये नमुद संगणकीय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परीक्षा |

| | | |
|---|---|---|
| | | उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विज्ञान तसेच तंत्रनिकेतनाच्या पदवीका धारकास ही अट शीथील राहील.<br>३. शैक्षणिक/ औद्योगिक/ शासकीय प्रयोगशाळेतील कामाचा अनुभव. |
| वयोमर्यादा | : | सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. |
| **६. ग्रंथालय परिचर [Library Attendant] (MTS)** | | |
| पदसंख्या | : | ०५ (पाच) |
| कंत्राट कालावधी | : | ११ महिने |
| एकत्रित मानधन | : | रु. १४,०००/- |
| शैक्षणिक अर्हता व अनुभव | : | १. ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात पदविका परिक्षा / मान्यताप्राप्त विद्यापीठातुन ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात पदवी परिक्षा उत्तीर्ण.<br>पदवी परिक्षा उत्तीर्ण असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल.<br>२. एम.एस.सी.आय.टी किंवा महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्रा.वि) यांचे शासन निर्णय क्रमांक मातंस २०१२/ प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ मध्ये नमुद संगणकीय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विज्ञान तसेच तंत्रनिकेतनाच्या पदवीका धारकास ही अट शीथील राहील.<br>३. शैक्षणिक/ शासकीय /औद्योगिक ग्रंथालयातील कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल. |
| वयोमर्यादा | : | सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. |
| **७. चपरासी [Peon]** | | |
| पदसंख्या | : | १० (दहा) |
| कंत्राट कालावधी | : | ११ महिने |
| एकत्रित मानधन | : | रु. १२,०००/- |
| शैक्षणिक अर्हता व अनुभव | : | वर्ग दहावी उत्तीर्ण आणि मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे व्यव्हारिक ज्ञान असणे आवश्यक. |

| | | |
|---|---|---|
| वयोमर्यादा | : | **सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.** |

याकरिता, पात्र उमेदवारांनी विद्यापीठाच्या www.litu.edu.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या विहित अर्जाच्या नमुनान्यात माहिती भरुन (आवश्यक सहपत्रांसह) आवदेनपत्र सर्व संबंधित प्रमाणपत्रे इत्यादींच्या स्वच्छ आणि सुवाच्छ स्वयंसाक्षांकित प्रतींच्या एकूण तीन प्रती **दिनांक २६ डिसेंबर, २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत** विद्यापीठाच्या आस्थापना शाखेत सादर करावे यानंतर प्रत्यक्ष किंवा टपालाव्दारे प्राप्त होणाऱ्या आवेदनाचा विचार करण्यात येणार नाही.

## अर्जदारांसाठी सुचना

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्यापूर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, इत्यादी बाबी पडताळून पाहाव्यात. तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) सदर जाहिरातीतील सर्व पदे कंत्राटी पध्दतीवर, तात्पुरत्या स्वरुपात, पदासमोर नमूद कालावधीकरीता भरावयाची असून काम समाधानकारक आढळल्यास सदर पदांवरील नियुक्तीचा कालावधी वाढविण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहे.

२) प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा.

३) सर्व पदांसाठी उमेदवारांस **मराठी भाषेचे ज्ञान** असणे आवश्यक आहे.

४) आवेदकांनी विद्यापीठाच्या www.litu.edu.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्येच टंकलिखित / हस्तलिखित किंवा संगणकीय प्रींट केलेला अर्ज **(परिपूर्ण भरलेला अर्जाचा नमुना व संबंधीत प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती)** एकूण **तीन प्रतीत** सादर करावा. अर्जाच्या विहित नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये / रकान्यामध्ये कुठलाही बदल करु नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य ठिकाणी नमूद करावे. अर्जदाराने आवेदनपत्रातील "प्रपत्र-अ"(Proforma 'A') मध्ये माहिती भरणे आवश्यक आहे. सदर प्रपत्रात माहिती सादर न केल्यास आपल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

५) मागासवर्गीय संवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत जात प्रमाणपत्र संलग्नित करणे अनिवार्य आहे. त्याशिवाय त्यांना मागासवर्गीय संवर्गाचा लाभ मिळणार नाही.

६) प्रत्येक पदासाठी अर्जासोबत मागासवर्गीय [अनुसुचित जाती (अ.जा.), अनुसूचित जमाती (अ.ज.), विमुक्त जमाती (वि.ज.), भटक्या जमाती (भ.ज.), विशेष मागासवर्गीय प्रवर्ग (वि.मा.प्र),व इतर मागासवर्गीय प्रवर्ग (इ.मा.व)] उमेदवारांनी रु. २००/- व खुल्या प्रवर्गातील उमेदवरांनी रु. ३००/- चा online भरणा केल्यायची पावती जोडावी.

### -: बँकेचा तपशील :-

**Bank Name : Indian Overseas Bank,**
**Branch : Pande Layout, Nagpur.**
**Account No. : 242101029082023**
**IFSC Code : IOBA0002421**

LAXMINARAYAN INNOVATION TECHNOLOGICAL
SCAN & PAY

UPI ID: LITUN2023@iob

७) **मागासवर्गीय संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या गुणांमध्ये ५% सुट देण्यात येईल.**

८) मुलाखतीस उपस्थित राहतेवेळी उमेदवाराने सर्व आवश्यक व संबंधित प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

९) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यवसायिक अनुभव, वय, जात, जातवैधता, इत्यादी संबंधी आवश्यक प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रती जोडाव्यात. अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.

१०) सुवाच्छ अक्षरात नसलेले, अपुर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहित नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अहर्ता व अनुभव धारण करीत नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रती नसलेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रांसह तीन प्रतींमध्ये नसलेले अर्ज अवैध ठरविल्या जातील व विचारात घेतल्या जाणार नाही.

११) **अर्जदाराने आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता, अनुभव व वय हे जाहिरात प्रकाशित झाल्याच्या तारखेपर्यंत धारण केलेले असावे.**

१२) अर्जाच्या छाननीअंती अर्जदार अपात्र ठरल्यास अर्जदारास मुलाखतीला समोर जाता येणार नाही. अधिक प्रमाणात आवेदनपत्र प्राप्त झाल्यास एका पदासाठी किमान पाच उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येणार नाही अश्या उमेदवारांचा आक्षेप ग्राह्य धरण्यात येणार नाही. तसेच त्यांच्यासोबत कोणताही पत्रव्यव्हार करण्यात येणार नाही.

१३) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधीत अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकीय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारांस अपात्र ठरविल्या जाईल.

१४) मुलाखतीस आलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१५) विद्यापीठात प्रशासनाव्दारे आयोजित मुलाखतीस येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवरांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरिता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१६) निवड प्रक्रिया सुरु झल्यानंतर किंवा नियुक्तीउपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व असा उमेदवार कायदेशीर कावाईस पात्र राहील.

१७) जाहिरातीत बदल किंवा दुरुस्ती किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहे. तसेच पदांची संख्या कमी जास्त करण्याचा अधिकारी सुध्दा विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

१८) जाहिरातीत नमूद केलेल्या पदांसंदर्भात कोणतेही वाद निर्माण झाल्यास सर्व वाद नागपूरातील सक्षम न्यायालयाच्या अखत्यारीत राहतील.

**कुलसचिव**
लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान
विद्यापीठ, नागपूर